प्रथमच महत्वाचा प्रश्न समोर मांडतो. सहा वर्षापूर्वी १४ जून २००७ रोजी भरपावसात नाटयपरिषदेच्या विरुध्द यशवंत नाटयसंकुलात प्रयोगिक व बालरंगभूमीला जागा मिळावी यासाठी आम्ही लढा दिला होता. आमचे नेते विजय तेंडुलकर व दामू केंकरे हे आज हयात नाहीत पण आमचा लढा थांबलेला नाही. या लढयातील मी एक महत्वाचा साथीदार, असं असूनही परिषदेच्या मध्यवर्ती शाखेने अध्यक्षपदासाठी माझे नाव सुचविले. माझी संमती घेण्यासाठी आलेल्या नाटयपरिषदेच्या प्रतिनिधीने या लढयाची आठवण करुन दिली तरीही परिषदेने आपला हात पुढे केला तो मी स्वीकारला, एवढयाचसाठी की आमच्या मागण्यांचा सकारात्मक विचार परिषद व आम्ही करु व ही समस्या एकत्र बसून सामंजस्याने सोडवू.

पुढच्या वर्षीच्या नाटयसंमेलनापर्यंत आमच्या मागण्या मार्गी लागाव्यात अशी आशा आहे. दुर्दैवाने तसे नाहीच झाले तर मी त्याची कारणं आपल्यापुढे ठेवीन. मी आशावादी आहे. शेवटपर्यंत प्रयत्न करीत राहीन.

रसिक हो, मराठी रंगभूमीवर निरनिराळया स्तरांतून सृजनकार्य घडते आहे. त्याची आजची स्थिती काय आहे हे जाणून घेणे महत्वाचं आहे. महाराष्ट्रात जेवढे सृजनकार्य होत आहे तेवढे इतरत्र दिसत नाही. बालरंगभूमी, हौशी, प्रायोगिक, व्यावसायिक सर्व स्तरांवर नाटयनिर्मिती व प्रयोग होतात. मी या सर्व स्तरांवर कार्य करणा-यांना भेटून आजची स्थिती, त्यांचे विचार, त्यांच्या अडचणी, मागण्या, तक्रारी जाणून घेण्याचा प्रयत्न केला व तो इथे मांडणार आहे. दोन दिवसांच्या या संमेलनात यांचा ऊहापोह व्हावा मला वाटते संमेलनाचे हेच उद्दिष्ट असते.

**बालरंगभूमी :-**

रसिकहो, मी पायापासूनच सुरुवात करतोय, शालेय व बालरंगभूमी हा पाया आहे . पाया मजबूत तर इमारत पक्की पण या पायाकडेच आम्ही दुर्लक्ष करतोय. बालरंगभूमीला दुय्यम समजतो आणि म्हणूनच हा महत्वाचा प्रस्ताव मांडतो.

शासनाने शालेय रंगभूमीचा विचार करुन नाटयकलेचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करावा. यासाठी तज्ञांकडून अभ्यासक्रम ठरवावा लागेल. महापालिकेच्या व खाजगी शाळांतून हा विषय शिकविला गेला पाहिजे अशी योजना तयार करावी. त्यासाठी पहिले पाऊल म्हणजे शिक्षकांना नाटयकलेचे शिक्षण द्यावे लागेल किंवा आज निरनिराळया विद्यापिठातील नाटयविभागातून प्रशिक्षित होऊन बाहेर पडलेल्या कलाकारांच्या अशा शाळांतून नियुक्त्या करण्याचा विचार करावा लागेल. संस्कारक्षम वयात विद्यार्थ्यांना नाटयकलेचे शिक्षण मिळाले तर त्यांच्याकडून भावी काळात रंगभूमी उजळून निघेल.

शालेय स्तरांवर नाटयस्पर्धा आयोजित होत असतातच. चार दशकांपूर्वी कुमार कला केंद्राच्या शालेय नाटयस्पर्धा आयोजित होत असत. गेली छत्तीस वर्षे वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान शालेय नाटयस्पर्धा आयोजित करीत आहे. महाराष्ट्र शासनाची बालनाटय स्पर्धा चालू आहेच. त्यातही बहुतांश शाळांचा सहभाग असतो. शासकीय पातळीवर बालनाटयस्पर्धा सुरु आहेत. त्यात आज बरीच सुधारणा झाली आहे. स्थानिक शिक्षणधिका-यांना विनंती करुन त्या विभागातील शालेय विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश दिला जातो त्यामुळे बाल प्रेक्षकांची गर्दी होते हे चित्र उत्साहदायी आहे. हयाच्याबरोबरीने शासनाने जिल्हा पातळीवर बालनाटय महोत्सवाचे आयोजन करावे त्यामुळे तेथील बालप्रेक्षकांना चांगली बालनाटय पहायची सवय लागेल.

नाटयकलेचा शालेय अभ्यासक्रमात समावेश झाल्यावर या बालनाटय स्पर्धा व शालेय नाटयस्पर्धा दर्जेदार स्वरुपात पहायला मिळतील असे मला वाटते. प्रशिक्षण देवून शालेय स्तरावर बालनाटयांची निर्मिती होते ती दर्जेदार होते. दोन उदाहरणे देतो.